वाचा :- १) संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ८, दि. ०२/०२/२०११
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र. स्था.नि.ले.१०१०/प्र.क्र.२६-ब/विमाप्रशा , दि. ३१/०३/२०११.

क्र.स्था.१८/ब/वार्षिक लेखे प्रमाणीकरण/वलेप अहवाल/

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य,कोकणभवन, ६ वा माळा,**
**नवी मुंबई ४०० ६१४**
**दिनांक:-** 30 JAN 2014

**कार्यालयीन आदेश क्र.- ०३**

**विषय :- नगरपरिषदांचे वार्षिक लेखे प्रमाणीकरणाबाबत.**

संचालनालयाकडून उपरोक्त वाचा क्र. १ मधील आदेशान्वये नगरपालिकेचे वार्षिक लेखे प्रमाणित करताना महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मधील नियम क्र. १०२ (२) नुसार प्रमाणित करण्यात यावे, असे कळविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र. ६० नुसार नगरपरिषद कलम १०२ उपकलम (३) अनुसार वार्षिक लेख्यांचा गोषवारा नमुना क्र. २८ प्रमाणे तयार करुन तो संचालक , जिल्हाधिकारी आणि मुख्य लेखापरीक्षक यांच्याकडे प्रत्येक वर्षी ३१ जुलैपूर्वी पाठविले पाहिजे.

उपरोक्त वाचा क्र. २ मधील शासन निर्णयान्वये १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार, परिपत्रक क्र. ४ मधील (म) नुसार राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांचे प्रमाणीकरण संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी करावयाचे असून योग्य प्रमाणीकरणाबाबत नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी पर्यवेक्षण करावयाचे आहे, असे आदेशित केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे वार्षिक लेखे तपासणे / प्रमाणित करण्याची जबाबदारी स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागावर सोपविली आहे. तथापि प्रादेशिक विभागांतर्गत लेखापरीक्षकांकडून नगरपालिकांचे वार्षिक लेखे प्रमाणित करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र. ६० नुसार नगरपरिषद कलम १०२ उपकलम (३) अनुसार नगरपालिकांचे वार्षिक लेखे ३१ जुलै पूर्वी तयार केले जातात व नियम ६१ नुसार ते मत्ता व दायित्व विवरण व प्रशासकीय अहवालासह लेखापरीक्षणास सादर केले जातात.

..२..